# वेध एक प्रवास

आमच्या अहमदनगर शहरात वेध सुरु झाला ,त्याची एक आनंददायक आठवण आहे.

मार्च १९६७ साली मॅट्रिक पास झालेले अ.ए.सोसायटी हायस्कूलचे आम्ही विद्यार्थी २००४ साली,म्हणजे तब्बल सदतीस वर्षांतर एकत्र आलेलो होते.त्यावेळी तिथे माजी विद्यार्थी म्हणून अुपस्थित असलेले सुप्रसिध्द अभिनेते सदाशिव अमरापुरकर(माझे पती) यांनी एक संकल्पना मांडली.ते म्हणाले,'आपण या शाळेत शिकलो,चांगलं संस्कारधन मिळवलं,त्याबद्दलची कृतज्ञता म्हणून या शाळेत सध्या शिकणाऱ्या आपल्या बांधवांसाठी आणि आपल्या गावातल्या इतर विद्यार्थी आणि पालकांसाठी खऱ्या अर्थाने अुपयुक्त ठरेल ,असा एखादा अुपक्रम आपण सुरु केला पाहिजे.अन्यथा सगळ्यांनी एकत्र येऊन फक्त जुन्या आठवणी काढून परत जायचं याला काही अर्थ नाही.''त्याच ठिकाणी त्यांनी ठाणे येथे त्यांचे मित्र डॉ. आनंद नाडकर्णी यांनी सुरू केलेल्या वेध व्यवसाय प्रबोधन कार्यक्रमाची सविस्तर माहिती साांगून तसाच अ्पक्रम नगरमध्ये सुरु करण्याची मनिषा व्यक्त केली.आम्हा सर्वांना ती कल्पना आणि कार्यक्रम इतका आवडला,कि तत्काळ तो सुरू करण्याचा निर्णय झाला.

अहमदनगर अेज्केशन सोसायटी संस्थेची पदाधिकारी असलेली आमची मैत्रीण छाया फिरोदिया हिने आयोजनाची सर्व जबाबदारी स्विकारण्याची तयारी दर्शवला.आमचे नगरचे वर्गमित्र धनंजय देशपांडे,गिरीश भालेराव,आडकर,सल्ला,नडीमेटला,जवाहर मुनोत हे सगळे 'स्नेहबंध ६७'चे कार्यकर्ते तिच्या मदतीला पुढे सरसावले.मग काय?'अच्छे काम मे देरी क्यू?'

मी आणि सदाशिवने मुबईहून आणि इतरांनी नगरच्या कामांची जाबाबदारी घेउन कामाला च लागलो.डॉ.आनंद नाडकर्णीही आनंदाने 'वेध' कार्यक्रम नगरला करण्यास तयार झाले.आणि सवांच्या सहकार्याने २६जुन २००५ रोजी पहिला

’नगर वेध’संपन्न झाला.मला वाटतं,ठाण्याच्या बाहेर सादर केलेला तो पहिलाच वेध होता.त्यनंतर आजमितीस .....ठिकाणी वेध कार्यक्रम यशस्वी रित्या संपन्न होतात.नगर वेधच्या  या अकरा वर्षांच्या वाटचालीत बरंच शिकायला मिळालं.

पहिली गोष्ट ,एखादा जाहीर कार्यक्रम करायचा असेल,तर किमान सहा महिने आधी त्याची संपूण योजना आपल्याकडे बारिकसारिक तपशीलासहित तयार पाहिजे.काय काय करावे लागेल,आणि कुठले काम कोण करणार हे पक्कं ठरवून त्याप्रमाणे जबाबदाऱ्या स्विकारून त्या निभावणारे कार्यकर्ते असले पाहिजेत आणि त्यांनी एकजटीने काम केले पाहिजे.प्रत्येक कामात शिस्त आणि सातत्य राखले जाणे महत्वाचे.डॉ.नाडकर्णींनी स्वत: अनेकवार मिटिंग्स घेऊन सर्वांना हे नियोजन शिकवलं.त्याची गरज असत.कारण एखादी गोष्ट करायची ठरल्यावर लोकांचा ुउत्साह अुदंड असता,पण नियोजन आणि शिस्त नसेल,तर उत्साह दुधासारखा उतू जातो,आणि कार्यक्रम फसतो.नाडकर्णी आणि अमरापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सगळ्यांनाच चार चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या.

पहिल्याच वेध कार्यक्रमात एक गंमत झाली.अर्धा कार्यक्रम झाला,आणि अचानक पावसाला सुरुवात झाली.वर छत होतं,पण पत्रे नव्हत.पावसाचा जोर वाढला,आणि मुलं पळू लागली. स्टेजवरून सांगितल्या जाणाऱ्या सूचनांकडे कोण लक्ष देणार?लहान शहरात विद्यार्थी पळून घरीच जाणारआणि मंडप ओस पडणार ही शक्यता जास्त होती.अचानक सदाशिव अमरापूरकर स्टेजवर आले,आणि डॉ.नाडकर्णींनी त्यांची मुलाखत घ्यायला सुरुवात केली.हा उस्फूर्त कार्यक्रम सुरु झाला,आणि जादू केल्यासारखी मुलं परत जागेवर आली,आणि दप्तरं डोक्यावर घेऊन ऐकत उभी राहिली. त्यांनी दोघांनी मुलाखत अशी काही ग मतीदार रंगवली,कि पाऊस कधी थांबला,आणि कार्यक्रम पुढ सुरू झाला,ते कुणाला कळलंच नाही.

आयोजक म्हणून ही काही अनुभव आले आणि शिकवून गेले.अर्थात ही प्रक्रिया अजून चालूच आहे.कार्यक्रमासाठी वक्ते निवडणे ,त्यांना संपर्क करून निश्चित करणे,होकार मिळाल्यावर ही त्यांच्या संपर्कात राहणे,ते वेळेत तिथे हजर राहतील असे पाहणे आणि त्यांची योग्य पध्दतीने पाठवणी करणे.ही कामे दिसतात तितकी सोपी नाहीत.कारण आपण बोलावतो,त्या व्यक्ती सर्वसामान्य नसतात.कुठल्यातरी क्षेत्रात विशेष प्राविण्य ,तसेच यश संपादन केलेल्या असतात.त्यांचे मोठे कार्य चालू असते.त्यांना फावला वेळ नसतो.त्यामुळे पहिला संपर्क करण्यासाठीच खूप शोध घ्यावा लागतो,आणि सातत्याने प्रयत्न करत रहावं लागतं.प्रत्यक्ष संपर्क झाल्यानंतर मात्र एवढ्या वरच्यापदावर पोचलेली ती माणसे सौजन्यशील असल्याचा,दिलेला शब्द कसोशीने पाळण्याचा,असेच सुखद अनुभव मला तरी जास्त आले.कधी कधी वेध सारख्या कार्यक्रमांची माहिती नसल्याने सुरुवातीला जरा कांकूं करणाऱ्या व्यक्ती प्रत्यक्ष कार्यक्रमावर,सादरीकरणावर,खुप खुष होऊन गेल्याचाही अनुभव आला.मात्र हे काम करत असतांना पेशन्स बराच काळ ठेवावा लागतो,आणि मग प्रयत्नांती यश येत,हे शिकता आलं.कधी कधी मोठ्या प्रतिक्षेनंतर मिळवलेल्या पाहुण्यांना अनपेक्षित अडचणींमुळे येणे रद्द करावे लागते.अशा वेळेला कार्यक्रम सुविहितपणे पार पाडण्यासाठी तयारी ठेवावी लागते.

वेध सारखे फक्त विद्यार्थ्यांनाच नव्हे,तर पालकांना,आज्जी आजोबांना ,पर्यायाने अवघ्या समाजालाच दिशा दाखवणारे अुपक्रम नगरसारख्या लहान ,ऐतिहासिक,आणि राजकारणाचा प्रभाव असलेल्या शहरात घडून येणे ही खरोखर अपूर्व घटना होती.नवीन विचार करायला प्रवत्त करणारा असा हा कार्यक्रम होता.त्याला कुठल्याही धर्माचा,पंथाचा ,विशिष्ट समाजगटाचा रंग,वास नव्हता.उलट हे सगळे भेद बाजूला ठवून पुढल्या पिढोन स्वत;चा उत्कष साधण्यासाठीं करीअरची निवड कशी करावी याचं जाणकारांकडून मार्गदर्शन

मिळत होतं.नगरकरांना हा बदल भावला. हवाहवासा वाटला.आणि म्हणून दरवर्षी लोक वेधची वाट पाहू लागले.

वेध चे गाणी हा तर मुलांना सर्वात आवडणारा भाग .ती गाणी पाठ करून इतर वेळेलाही मुलं ती म्हणत असतात.

या दहा वर्षात काही अडचणी आल्या.संस्थेचे संचालक शांतीभाऊ फिरोदिया गेले.सदाशिव अमरापुरकरांचं निधन झालं.धनंजय देशपांडे हेही जग सोडून गेले.पण या सगळ्यांच्या स्मृतीला ंवंदन करून वेध चालूच राहिला.हाही मला वाटतं,या कार्यक्रमाने आणि डॉ.नाडकर्णींनीच आम्हाला शिकवलेला धडा.अ.ए.सोसायटीचा स्टाफ आणि शिक्षकवर्ग यांच्या सहकार्याचा इथे ुअुल्लेख करणे अगत्याचे आहे.

## नगर वेध २०१६ ला येणाऱ्या पाहुण्यांची संभाव्य यादी

‘डॉ.राणी बग (डॉक्टर,समाजकार्यकर्ता)

पुष्कराज चिरपूटकर(अभिनेता)

विनोद शिरसाठ(संपादक,विचारवंत,लेखक)

कुमारी संजीवनी ठमके(धावपटू)

महेश भागवत(पुलिस कमिशनर हैदराबाद)